# University of Mumbai

परीक्षा विभाग,
वाणिज्य (निकाल) कक्ष,
मुंबई ४०० ०९८.
दुरध्वनी क्र. २६५४३३९९

क्रं.परीक्षा/परीक्षा अर्ज/वाणिज्य (निकाल) कक्ष/३६/२०१९.

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम–२०१६ च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही आम्रलागू बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार शैक्षणिक वर्षे २०१९–२० मधील प्रथम सत्र (उन्हाळी)–२०१९ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे परीक्षा प्रवेश अर्ज विहीत फीसह M.K.C.L. या अभिकरणामार्फत (mum.digitaluniversity.ac) वरून Online घेण्यात येणार आहेत.

खालील नमुद केलेल्या अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:–

2COO135 T.Y.B.Com. (Sem. V) (CBSGS) (75:25) May, 2019.
2COO145 T.Y.B.Com. (Sem. V) (Choice Based) (R-2018) May, 2019.
2COO136 T.Y.B.Com. (Sem. VI) (CBSGS) (75:25) May, 2019.
2COO146 T.Y.B.Com. (Sem. VI) (Choice Based) (R-2018) May, 2019.

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | म्हाविद्यालयाने Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | परीक्षा विभगाकडे परीक्षा अर्जाचा व परीक्षा शुल्क भरण्याचा तपशील जमा करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | ७/२/२०१९ ते १८/२/२०१९ | २०/२/२०१९ |
| २. | विलंब शुल्क रू. १००/– सहित | २०/२/२०१९ ते ०२/०३/२०१९ | ५/३/२०१९ |
| ३. | अति विलंब शुल्क रू.५००/– सहित | ५/३/२०१९ ते १६/३/२०१९ | १९/३/२०१९ |

# University of Mumbai



तरी वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम/सत्र निहाय परीक्षा अर्ज भरून घेण्यापासून ते परीक्षा शुल्क भरण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वर पूर्ण करून त्यांचे परीक्षा अर्ज भरल्याच्या तपशीलाची प्रत (Exam Form Submission Report) व परीक्षा शुल्क भरल्याची पावती परीक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करण्यात यावी. पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही.

परीक्षा प्रवेश अर्ज सिवकारण्याच्या अतिविलंब शुल्काच्या दिवशी सायंकाळी ६.०० वाजता (२२/०३/२०१९ रोजी) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायांचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम परीक्षा केंद्र, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत याची खात्री करून घ्यावी. परीक्षा अर्ज Inward झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विंनती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती. तरी या परिपत्रकामध्ये नमूद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव.

# University of Mumbai



अ. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित :—

१ संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा भवन, मुंबई—४०० ०९८.
२ सर्व उपकुलसचिव, परीक्षा भवन, मुंबई—४०० ०९८.
३ उपकुलसचिव (नावनोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०९८.
४ उपकुलसचिव/मुख्य लेखपाल, वित व लेखा विभाग, परीक्षा भवन, मुंबई—४०० ०९८.
५ सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा भवन, मुंबई—४०० ०९८.
६ सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०९८.
७ सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई—४०० ०९८.
८ समन्वयक, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०९८.

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित :—

१ मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०३२.
२ उपकुलसचिव (जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०९८.
३ कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई—४०० ०३२.
४ प्र.कुलगुरू/कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी/संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

5/2/19

(डॉ. विनोद प्र. पाटील)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

दिनांक :— ५/२/२०१९.
मुंबई — ४०० ०९८.